पोलीस अधिक्षक कार्यालय,धुळे
दिनांक ११/०७/२०१६

प्रेस नोट दि .११/०७/२०१६

आझादनगर पो.स्टे.भाग ५ गुरनं ७६/२०१६ भादंवि क. ३९२,३४ प्रमाणेचा गुन्हा दि.०१/०७/२०१६ रोजी दाखल असून त्यात फिर्यादी पेराजभाई जेठाभाई भानुशाली वय-६८ रा.प्लॉट नं.१८ नित्यानंद नगर, धुळे हे असून त्यांनी फिर्याद दिली की, दि.३०/०६/२१६ रोजी रात्री ०९.०० सुमारास ते स्वतः व मॅनेजर असे त्यांचे स्वतःचे दुकानात हजर असतांना दोन अज्ञात इसमांनी दुकानात प्रवेश करुन हत्याराचा धाक धाखवून गल्ल्यातील ४० हजार रुपये रोख, दोन मोबाईल हॅण्डसेट सॅमसंग व नोकीया कंपनीचा व तसेच काऊंटरवरील कागदपत्र असे जबरीने हिसकावुन नेले बाबत वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

तसेच धुळे शहरात अशाच प्रकारचा गुन्हा धुळे शहर पो.स्टे.गु.र.नं.१४२/२०१६ भादंवि क.३९३,३४ सह आर्म ॲक्ट ३/२५ प्रमाणे दि. ०३/०७/२०१६ रोजी दाखल आहे. सदर अशाच प्रकारचे धुळे शहरात दोन गुन्हे दाखल झाल्याने शहरातील व्यापा-यांमध्ये व सर्व सामान्य जनतेमध्ये भितीचे वातावरण तयार झाले.

सदर गुन्हे उघडकीस आणणेकामी मा.पोलीस अधीक्षक श्री. एस.चैतन्या, धुळे, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.चंद्रकांत गवळी, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, धुळे शहर विभाग श्री.हिंमत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.रमेशसिंग परदेशी, पोसई प्रेमनाथ ढोले, पोसई रामकृष्ण सोनवणे, असई घनश्याम मोरे, पोना/१२४२ पंकज चव्हाण, पोकॉ/११७५ दिनेश परदेशी, पोकॉ/१३०० पंकज खैरमोडे, पोकॉ/१४३१ किरण सावळे, पोकॉ/३० सुनिल पाथरवट, पोकॉ/११३४ निलेश महाजन, पोकॉ/६२७ कबीर शेख, पोकॉ/१२८६ संदीप खैरनार, पोना/११४७ हाजी मो.मोबीन अशांनी सखोल चौकशी व गुप्त माहितीच्या आधारे विनोद गणेश मरसाळे वय-३० रा.प्रियदर्शनी नगर, नगावबारी देवपूर, धुळे यास ताब्यात घेऊन त्यास सविस्तर विचारपूस केली असता त्याने त्याचा नातेवाईक गुरु अर्जून भालेराव व गुरु याचा मित्र नांव माहीत नाही दोन्ही रा.येवला जि.नाशिक असे आम्ही गुरु याचे मोटार सायकलवरुन पारोळा चौफुलीकडून गिंदोडीया चौकाकडे जात असतांना रोडवर धुलिया गॅस एजन्सी समोरील दुकानात जाऊन त्यांना मी व गुरु अशांनी आमचेकडील देशी बनावटीचे पिस्टलने धाक दाखवुन त्यांचेकडून रोख रुपये व दोन मोबाईल हॅण्डसेट तसेच काऊंटरवरील कागदपत्र असे बळजबरीने हिसकावुन घेतले. आमचा तिसरा साथीदार दुकानाबाहेर मोटार सायकल घेऊन उभा होता. त्यावरुन आम्ही पळून गेलो बाबत सांगितले. त्यावरुन आरोपी विनोद गणेश मरसाळे वय-३० यास गुन्ह्यात अटक करुन मा.न्यायालयात दि.१०/०७/२०१६ रोजी हजर केले असता त्याची दि.१४/०७/२०१६ पावेतो पोलीस कस्टडी मिळाली आहे. दरम्यान आरोपीने दिलेल्या निवेदनावरुन ०२ पिस्टल व ०२ काडतूस असे तपासकामी जप्त केले आहेत. अटक आरोपी याचे साथीदार यांचा येवला येथे जाऊन शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत त्यांचा आझादनगर पो.स्टे.शोध पथकाचे अधिकारी व कर्मचारी शोध घेत आहेत.

तसेच धुळे शहर पो.स्टे.हद्दीत दाखल असलेला गुरनं १४२/२०१६ भादंवि क.३९३ वगैरे हा वरील आरोपींनीच केले असल्याबाबत सुध्दा कबुली दिली आहे. अल्पावधीत पोलीसांनी सदरची कारवाई केली आहे.